संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०
17 MAR 2026
प्राप्त झाले सही...................

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, लेखा अधिकारी संवर्गातील श्रीमती नयना ना. चव्हाण यांच्या महसूल संवर्ग बदलीबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन आदेश :-संलेको-२०२६/प्र.क्र.०३(भाग-१)/कोषा प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दि. १७.०३.२०२६.

## शासन आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, लेखा अधिकारी संवर्गातील (एस-१६ रुपये ४४९००-१४२४००/-) खालील विवरणपत्रात नमुद श्रीमती नयना नारायण चव्हाण यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शासन अधिसूचना दि.१४.०७.२०२१ मधील तरतूदींनुसार त्यांचा स्तंभ क्र.३ येथे नमूद केलेला महसूल विभाग बदलून त्यांना स्तंभ क्र.४ येथे नमूद केलेल्या महसूल विभागात महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ मधील कलम ४(४) व ४(५) मधील तरतुदीनुसार स्तंभ क्र.५ मध्ये नमूद पदावर बदली करण्यात येत आहे.

| अ.क्र | अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व कार्यालय | सध्याचा कार्यरत महसूल विभाग | बदलून दिलेला महसूल विभाग | महसूल संवर्ग बदलीने पदस्थापनेचे पद व कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | श्रीमती नयना नारायण चव्हाण, लेखा अधिकारी (संगणकीकरण) सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर. | नागपूर | कोकण-२ | कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई. |

२. वरीलप्रमाणे बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी बदली झालेल्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार कारवाई करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

३. संबंधित अधिकाऱ्यांनी बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांना अवगत करावे.

४. वरील अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांच्या वैयक्तीक माहितीचा तपशिल HRMS मधील नमून्यात भरुन नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत शासनास तसेच संचालनालय, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ता. र. पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
३. संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई,

४. महालेखापाल -२/१(लेखा व अनुज्ञयेता /लेखा परीक्षा) महाराष्ट्र मुंबई/नागपूर *
५. प्रधान सचिव (ले.व को .), यांचे स्वीय सहाय्यक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. संबंधित अधिकाऱ्यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख,*
७. श्रीमती नयना चव्हाण, लेखा अधिकारी, *
८. निवड नस्ती कोषा प्रशा-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(* संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)

D:\gaurav dande\बदली\AO\२०२६\श्रीमती नयना चव्हाण.docx